● सोमवार, दि. २३ डिसेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १४५ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### अर्थपूर्ण जीवन जगण्याची संधी शोधली तरच शिष्यवृत्तीचे चीज होईल-अमृत बंग

## जेईएफच्या पायाभूत शिक्षण अभियानास सर्वतोपरी सहकार्य - जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ

**जालना । प्रतिनिधी -** आजच्या या जमान्यात कुणी-कुणाकडे लक्ष द्यायला तयार नाही. जो तो आपल्यापुरतेच पाहतो आहे. अशा परिस्थितीत जालना एज्युकेशन फाउंडेशन दानशूर व्यक्तिम त्वांच्या माध्यमातून दरवर्षी आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे आर्थिक पाठबळ देऊन त्यांचा शिक्षणाचा मार्ग सुकर करत आहे. या शिष्यवृत्तीचा उपयोग फक्त अर्थप्राप्तीसाठी न करता अर्थपूर्ण जीवनाची संधी शोधण्यासाठी केला आणि शिष्यवृत्ती घेणारे उद्या देणारे बनले तर जेईएफ शिष्यवृत्तीचे चीज होणार होईल. त्यादृष्टीने आपले मार्गक्रमण असायला हवे, असा मौलिक सल्ला निम ाण युवा उपक्रम व सर्च फाउंडेशन गडचिरोलीचे सहसंचालक अमृत अभय बंग यांनी विद्यार्थ्यांना दिला.






लोकसभागातून राबविण्यात येत असलेल्या जेईएफ शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत आर्थिक दुर्बल घटकातील वैद्यकीय, अभियांत्रिकी, वाणिज्य आदी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या ३०५ विद्यार्थ्यांना ३३ लाख १७ हजार रुपयाची शिष्यवृत्ती प्रदान सोहळा आज रविवार दि. २२ डिसेंबर रोजी श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालयात पार पडला, त्याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून अमृत बंग बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, कृषीभूषण विजयअण्णा बोराडे हे उपस्थित होते तर व्यासपीठावर जालना एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष सुनीलभाई रायठठ्ठा, उपाध्यक्ष प्रा. सुरेश लाहोटी, सचिव सुरेश कुलकर्णी यांची उपस्थिती होती.

अमृत बंग पुढे म्हणाले की, शिक्षण हे आर्थिक आणि कौटुंबिक स्थिती बदलण्याचे माध्यम आहे. खूप शिकून मोठे व्हा. कुठेही शिकायला जा. मात्र, आपल्या मातीसाठी योगदान द्या. येथे शिकून अनेक जण परदेशात जातात. त्यामुळे त्यांच्या बुद्धिमत्तेचा आपल्या देशाला काय उपयोग होणार? असा प्रश्न उपस्थित करून, आपण आपल्या मातीच्या कामी आले पाहिजे. समाजाला आपला काय उपयोग होईल, यावर विद्यार्थ्यांचा फोकस असला पाहिजे. शिक्षणाचा उपयोग कसा घ्यायचा, हे प्रत्येकाला कळायला पाहिजे. जीवनाचा अर्थ काय आहे, याचा विचार प्रत्येकाने केला पाहिजे, असे सांगून विद्यार्थ्यांनी व्यसनापासून दूर राहावे, असा सल्ला त्यांनी दिला. दारू पिणे म्हणजे प्रतिष्ठेचे लक्षण आणि न पिणे म्हणजे गावंढळ असेच चित्र निर्माण केले जात आहे, ही बाब अत्यंत दुर्दैवी आहे. मद्यपानाच्या बाबतीत पाश्चात्य कंपन्या भारताला फोकस करत आहेत, असे सांगून युवा पिढीने मद्यपान आणि इतर व्यसनापासून दूर राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ म्हणाले की, प्रत्येक देशाचे वेगवेगळे प्रश्न आहेत. सन २०२५ मध्ये युवा पिढी ही लोकसंख्येचा एक भाग असेल. मोबाईलचा वापर म्हणजे चांगल्या आणि वाईट सवयीचा एक भाग बनतो आहे. मेंदू थकून जाईल एवढा मोबाईलचा वापर होता कामा नये. मोबाईल दुधारी शस्त्र आहे. आज अनेक जण मोबाईलच्या माध्यमातून ऑनलाईन लेक्चर बघून वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शाखेला प्रवेश मिळवत आहे तर अनेकजण व्हाट्सअप, इंस्टाग्राम, फेसबुक यावर एवढे व्यस्त आहेत की अतिवापरामुळे मनोरुग्ण बनत आहेत. काहींना दवाखान्यात ॲडमिट करण्याची वेळ येते आहे. ते अमूल्य वेळ वाया घालवत आहेत. अभ्यासावर लक्ष केंद्रित करा, सॉफ्ट स्किल आत्म सात करा आणि रोजगारक्षम बना, असा असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. जालना एज्युकेशन फाउंडेशन पढो जालना अभियानाच्या माध्यमातून पायाभूत शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य पार पाडत आहे. पायाभूत शिक्षण आणि अंकगणित मजबूत असेल तरच आत्मविश्वास वाढतो. हे कार्य जालना एज्युकेशन फाउंडेशन चांगल्या प्रकारे करत असल्याने या अभियानाचा विस्तार बढो जालना असा करत मराठवाडा पातळीवर हे अभियान राबवावे, त्यासाठी जिल्हा प्रशासनाचे सर्वतोपरी सहकार्य राहील, अशी ग्वाही डॉ. पांचाळ यांनी दिली.

प्रास्ताविकपर भाषणात फाउंडेशनचे उपाध्यक्ष प्रा. सुरेश लाहोटी म्हणाले की, शिष्यवृत्ती योजनेचे हे चौथे वर्ष असून, दानदात्यांच्या माध्यमातून आतापर्यंत १ कोटी १५ लाखाची शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली आहे. आम्ही केवळ माध्यम असून, दानदात्यांच्या सहकार्यामुळे पुढील वर्षी ५०० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा आमचा प्रयत्न राहील. योग्यवेळी केली जाणारी मदत विद्यार्थ्यांचे जीवन बदलू शकते. त्याच उद्देशाने शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आली आणि दरवर्षी विस्तार होत आहे. जिल्हा पातळीवर राबवली जाणारी महाराष्ट्रातील ही सर्वात मोठी शिष्यवृत्ती योजना ठरत असल्याचे सांगून, फाउंडेशनच्या म ाध्यमातून विद्यार्थ्यांसाठी मोफत कोचिंग, संगणक प्रशिक्षण, इंग्लिश स्पिकिंग आदी उपक्रम राबविले जात असल्याचे ते म्हणाले. शितल सराटे, राहुल सातपुते, नवीन मोर या शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी मान्यवर आणि शिष्यवृत्ती योजनेसाठी आर्थिक योगदान देणाऱ्या ५३ दानदात्यांच्या हस्ते पॉलिटेक्निकच्या २५२, इंजिनिअरिंगच्या १३, एमबीबीएसच्या ३, बीएससी नर्सिंगच्या ८, बी. फार्मसीच्या २, कॉमर्सच्या ११, बीएससी ॲग्रीच्या ४ तर शिक्षण घेत असलेला स्टाफ आणि त्यांचे पाल्य अशा एकूण ३०५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली.

या कार्यक्रमाला शहरातील मान्यवर, शिक्षणप्रेमी, विद्यार्थी आणि त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फाउंडेशनचे सचिव सुरेश कुलकर्णी यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार प्रा. राहुल लाहोटी यांनी मानले.

---

युवा आदर्श

**आयुष्य मान ...**

अति महत्वकांक्षेला
सरळ दाखव अस्मान
आकाश नको ठेंगणे
न्हावे लागेल भस्मानं
बंडखोरी दडपू टाका
घालेल उगाचं थैमान
कटू निर्णय धाडसाचे
जोशात काढ फर्मान
सोसेल रूचेल तेवढा
गुपचुप करा अपमान
डोईवरून नको पाणी
कशास फुकटचामान
कायम ठेवावे सत्तेत
भले चांगले विद्यमान
कार्यकुशल निष्ठावान
योग्य साधे विद्या मान
भ्रष्टाचार शिंतोडेथोडे
वाकवेल तीर कमान
शुध्द चरित्र येता नेता
उंचवावी उंच कमान
स्थिर स्थावर निश्चित
धष्ट पुष्ट हवे यजमान
येतेलं अन् जातीलही
अस्थिर असे मेहमान
निष्ठेने करा जन सेवा
सत्ताहोई आयुष्यमान
मुश्कीले लाभे सुसंधी
जन भावनेचा सन्मान

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

---

### मस्साजोग व परभणी घटनेसंदर्भात सपोनी वैशाली देठे यांना निवेदन

## सखोल चौकशी करून दोषीवर कडक कारवाई करण्याची सकल मराठा समाजाची मागणी



**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्गुण झालेल्या खुन व परभणी येथे पोलीस कोठडीत सोमनाथ सुर्यवंशी यांचा झालेला मृत्यू या दोन्ही घटना विषयी जाफ्राबाद पोलीस ठाणे येथील सहायक पोलिस निरीक्षक वैशालीताई देठे पवार यांना सकल मराठा समाज बांधव यांनी दिले. या निवेदनात म्हटले आहे की दिनांक ९ डिसेंबर रोजी बीड जिल्ह्यातील मसाजोग गावचे सरपंच कै. संतोष देशमुख यांचे अपहरण करुन अत्यंत क्रूरपने,अम ानवीय पद्धतीने निर्दयी अशी हत्या करण्यात आली आणि आज १४ दिवस उलटूनही या घटनेतील आरोपी मोकाट फिरत आहेत. तरी आपल्या मार्फत आम्ही शासनास कळवीत आहोत की या अमानवीय कृत्यात सहभागी प्रत्येक आरोपीस लवकरात लवकर अटक करून फाशीची शिक्षा देऊन कै. संतोष देशमुख यांना व त्यांचा कुटुंबीयांना लवकरात लवकर न्याय द्यावा ही आपणास विनंती करीत आहोत, तसेच परभणी जिल्ह्यात निघालेल्या मोर्चात पोलीस प्रशासनाने अटक केलेल्या भीमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी यांचा मृत्यू हा पोलीस कोठडीत झाला असून या घटनेचा निषेध करून **पान २ वर**

## काव्य कस्तुरीमध्ये भावभावनांची सुंदर गुंफण; थाटात प्रकाशन सोहळा संपन्न



**जालना । प्रतिनिधी -** काव्य कस्तुरी या सौ. स्वाती रत्नपारखी लिखीत कविता संग्रहामध्ये लेखिकेने जीवनाच्या आणि विशेष करून स्त्री जीवनासह अध्यात्म, ग्राम ीण भागातील जुळलेली नाळ या सर्व बाबींचा चपखलपणे समावेश केलेला आहे. त्यामुळे हा कविता संग्रह निश्चितच वाचकांच्या पसंतीस उतरेल असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक विश्वासराव देशपांडे यांनी रविवारी केले.

येथील हॉटेल आनंदी व्हेजमध्ये हा काव्य कस्तुरीचा प्रकाशन सोहळा उत्साही वातावरणात पार पडला. यावेळी ज्येष्ठ समीक्षक डॉ. शशीकांत पाटील, लेखिका अर्चना डावरे, प्राचार्य बसवराज कोरे, ओंकार प्रकाशनचे संस्थापक अभय शास्त्री, लेखिका स्वामी रत्नपारखी यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

प्रारंभी प्रा.डॉ. शशीकांत पाटील यांनी काव्य कस्तुरीवर भाष्य करताना त्यातील अनेक बारकावे आणि भावनांचा कल्लोळ **पान २ वर**

## तरुणांमध्ये मोबाइलचे व्यसन चिंताजनक; शिक्षणासोबतच मुलांना सुसंस्काराची गरज

निवृत्ती महाराज इंदोरीकर



दत्ता देशमुख

**टेंभुर्णी -** भरकटत चाललेल्या आजच्या युवा पिढीला वेळीच रोखणे गरजेचे आहे. केवळ चांगले शिक्षण देण्याच्या हव्यासापोटी सुसंस्काराकडे दुर्लक्ष होता कामा नये. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेत आजही दर्जेदार शिक्षणासोबत विद्यार्थ्यांत सुसंस्कार रुजवले जातात. त्यामुळे चांगल्या शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना सुसंस्कार देणाऱ्या शाळांची पालकांनी निवड करणे गरजेचे आहे.

आजच्या युवा पिढीत वाढत चाललेले मोबाइलचे व्यसन चिंताजनक आहे. याला वेळीच पायबंद घातला नाही तर येणारा काळ आपल्याला माफ करणार नाही. यासाठी पालकांनो आजच जागी व्हा, असे भावनिक आवाहन समाजप्रबोधनपर कीर्तनकार निवृत्ती महाराज इंदोरीकर यांनी केले.

जाफराबाद तालुक्यातील माहोरा येथील छत्रपती शिवाजी महाराज आश्रम शाळेच्या प्रांगणात गुरुवारी सायंकाळी आयोजित **पान २ वर**

## फनरनर्स- रोट्रॅक्ट क्लब तर्फे आयोजित मॅरेथॉनमध्ये धावले दोन हजार स्पर्धक

**जालना । प्रतिनिधी -** सदृढ आरोग्यासाठी नियमित चालणे,धावणे महत्त्वाचे असून जनसामान्यांना आरोग्य दायी जीवनशैलीची प्रेरणा मिळावी या हेतूने येथील फनरनर्स-रोट्रॅक्ट क्लब तर्फे आयोजित फनरनर्स रोट्रॅक्ट मॅरेथॉन रविवारी ( ता.२२) स्पर्धा आयोजित करण्यात आली. यास उत्स्फ ूर्त प्रतिसाद मिळाला. लोकप्रतिनिधींसह २००० धावपटू स्पर्धेत धावले.



अब दौडेगा जालना संकल्पनेवर आधारित स्पर्धेचा मंठा चौफुली परिसरातील रॉयल रिजेन्सी येथे सकाळी ०६.३० वा. खा. डॉ. कल्याण काळे, आ. अर्जुनराव खोतकर, माजी मंत्री राजेश टोपे, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी व सर्व प्रायोजक यांच्या हस्ते झेंडा दाखवून स्पर्धेस प्रारंभ झाला. ०३ कि. मी. ०५ कि. मी. १० कि. मी. अशा तीन विभागात वयोगटानुसार स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे १० कि. मी. १८ ते ४५ वयोगट पुरुष- प्रथम अंगद कान्हेरे (३४ मि. ४९ से.), द्वितीय वैभव शिंदे, तृतीय ज्ञानेश्वर पासे, महिला- प्रथम प्रमिला बाबर ( ४३ मि. ०९ से.), द्वितीय प्रज्ञा बोर्डे, तृतीय सुप्रिया मापारी,

१० कि. मी. ४५ पुढे पुरुष प्रथम- चंद्रमोहन मेहरा ( ४४.१८ मि.), द्वितीय जितेंद्र अग्रवाल, तृतीय गोविंद राठी, म हिला - प्रथम सुगंधा पाटील, द्वितीय- ज्योती पाटील, तृतीय सोनाली खेरूडकर,

०५ कि. मी. १८ वयोगट पुरुष- प्रथम योगेश शिंदे ( १८.१४ मि.), द्वितीय म नोज चाटे, तृतीय अभिजित कराळे, म हिला- प्रथम श्रध्दा चंद्रे (२८ मि.), द्वितीय पृथा अग्रवाल, तृतीय भक्ती पवार,

०५ कि. मी. १८-४५ वयोगट पुरुष प्रथम शंकर गडदे ( १८.६ मि.), द्वितीय रोहित ढवळे, तृतीय अभिषेक बनकुळे, महिला- प्रथम कोमल शिहीरे ( २५.४४ मि.), द्वितीय निकिता शेळके, तृतीय पूजा तौर,

०५ कि. मी. ४५ पुढे पुरुष - प्रथम दिपक गिडाम ( २६ मि.), द्वितीय जयंत केंदर, तृतीय महेंद्र डहाळे,

महिला- प्रथम विभागून सुनीता लूणीया (३९ मी), द्वितीय अलका धांडे ( ४१.१८ मि.), **पान २ वर**

संपादकीय पान

# संगीतमय कलाकृती 'लेगसी'चे अनावरण

जुहू येथील जे.डब्ल्यू. मॅरियट येथे एका भव्य समारंभात, संगीत दिग्गज अनूप जलोटा आणि त्यांचे शिष्य सुमीत टप्पू यांनी त्यांच्या बहुप्रतिक्षित संगीत अल्बम 'लेगसी' चे अनावरण केले. हा कार्यक्रम चार दशकांच्या सखोल गुरु-शिष्य परंपरेचा उत्सव होता, ज्याने सीमा, शैली आणि काळाचे सर्व अडथळे पार केले आहेत.

संगीत आणि चित्रपट जगतातील अनेक मान्यवरांनी आपल्या उपस्थितीने या नेत्रदीपक संध्याकाळला उजाळा दिला. यामध्ये पं. हरिप्रसाद चौरसिया, हिंदुजा परिवार, अनुराधा पौडवाल, जसपिंदर नरुला, तलत अजीज, पं. भावदीप जयपूरवाले आणि आदित्य बिर्ला समूहाचे व्यवस्थापकीय संचालक ए. अशोक खोसला, चंदन दास, घनश्याम वासवानी, प्रतिभा सिंग बघेल, अन्वेशी जैन, विपिन अनेजा, आकृती कक्कर, मीनल जैन, सुदीप बॅनर्जी, राम शंकर, क्षितीज वाघ, प्रियंका वैद्य, मयुरेश पै, श्रबणी, श्रबणिंद्र आणि अनेक कलाकारांसह बालसुब्रमण्यन. इतर प्रमुख नावांचा समावेश होता.

हा अल्बम सात गाण्यांचा संगीतमय उत्सव आहे, शास्त्रीय, भक्ती, अध्यात्मिक, गझल, सूफी आणि गीत यांसारख्या शैलींचा एक मिलाफ आहे. संगीताच्या अतुलनीय शक्तीला आणि गुरू-शिष्याच्या पवित्र नात्याला ही श्रद्धांजली आहे.

या प्रसंगी, अनूप जलोटा यांनी सुमीत टप्पूसोबतच्या नात्याची सुरुवातीची आठवण करून दिली आणि ते म्हणाले, फिजीला माझी पहिली भेट मी कधीही विसरणार नाही, जिथे मी सुमीतच्या कुटुंबाला भेटलो. तेव्हा लहान असलेला तरुण सुमीत माझ्या सर्व कार्यक्रमांना उपस्थित असायचा आणि संगीतात मग्न असायचा. मला त्याच्या डोळ्यात एक चमक दिसली, एक अनमोल कनेक्शन. आज त्यांना जागतिक दर्जाचे कलाकार म्हणून पाहणे हा माझ्यासाठी अभिमानाचा क्षण आहे.

मनापासून कृतज्ञता व्यक्त करताना, भावनिक सुमीत टप्पू म्हणाला, अनुपजींना भेटणे हा माझ्या आयुष्यातील सर्वात मोठा टर्निंग पॉइंट होता. आपले बंधन या जीवनापुरते मर्यादित नाही - ते शाश्वत असल्याचे दिसते. हा अल्बम 'वारसा' त्यांनी मला दिलेल्या मार्गदर्शन, प्रेम आणि प्रेरणा यांचे प्रतिबिंब आहे. हा अल्बम स्वतःच खास आहे आणि मला खात्री आहे की तो संगीतप्रेमींना भुरळ घालेल.

अल्बममधील ट्रॅक त्याच्या अद्वितीय कलेचे प्रदर्शन करतात. हायलाइट्समध्ये चतुरंग, श्याम चौरासी घराण्याचा एक शास्त्रीय तुकडा आणि प्रभुजी तुम चंदन आम्ही पाणी, लाइव्ह सिम्फनी ऑर्केस्ट्रासह एक भक्तिपूर्ण रचना समाविष्ट आहे.




भावनिक गझल राबता आणि जिवंत सूफी गाणी मेहेरबानियां त्यांच्यातील सुसंवाद आणि विविधता दर्शवतात. शायद आणि सफर सारखे ट्रॅक आधुनिक उर्जा आणतात, तर हरी, जो जागतिक शांततेचा एक ध्यास आहे, अल्बमचा शेवट आध्यात्मिक उंचीवर करतो.

चार दशकांपूर्वीचा एक अविस्मरणीय फोटो प्रदर्शित झाल्यावर हा सोहळा आणखीनच भावूक झाला होता, ज्यात त्याचा गुरू अनूप जलोटा यांच्या मांडीवर छोटा सुमीत दिसत होता. फिजीमधील सोनेरी समुद्रकिनाऱ्यावर काढलेला हा फोटो त्याच्या विलक्षण प्रवासाची सुरुवात दर्शवितो.

'वारसा' हा केवळ अल्बम नाही - तो संगीत, भक्ती आणि अतूट बंधनाचा चिरंतन उत्सव आहे. अनूप जलोटा आणि सुमीत टप्पू ही कालातीत कलाकृती जगासमोर आणत असताना, ते श्रोत्यांना भावनांचा संगम, परंपरा आणि संगीतातील उत्क्रांतीच्या सौंदर्याचा पुरावा अनुभवण्यासाठी आमंत्रित करतात.

## आर्थिक उदारीकरणाचे जनक

भारताचे माजी पंतप्रधान, नवीन आर्थिक धोरणांची सुरवात करणारे, विद्वान व्यक्तिमत्व पी व्ही नरसिंहराव यांची आज पुण्यतिथी. २८ जून १९२१ रोजी आंध्रप्रदेशातील करीम नगर जिल्ह्यातील वंगारा या गावात त्यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण उस्मानिया विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि नागपूर विद्यापीठ येथे झाले. मातृभाषा तेलगूबरोबरच हिंदी, इंग्रजी, मराठी, कन्नड यासारख्या दहा भाषांसह सहा विदेशी भाषा देखील त्यांना अवगत होत्या. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात आणि हैदराबाद मुक्ती संग्रामात भाग घेतला. १९३५ साली हैदराबादच्या निजामाने विद्यापीठात वंदे मातरम हे गीत गण्यास बंदी घालून निजामाचे गौरव करणारे गीत गाण्याचा आदेश दिला होता तेंव्हा विद्यार्थी दशेतील नरसिंहराव यांनी त्याला कडाडून विरोध केला होता. १९६२ साली ते पहिल्यांदा केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्री बनले. १९७१ सालापर्यंत ते केंद्रात मंत्री होते. या दरम्यान त्यांनी गृह, परराष्ट्र आणि संरक्षण यासारखी महत्वाची खाती सांभाळली. १९७१ ते १९७३ या काळात ते आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री होते. त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या काळात भूमी सुधारणा लागू करणारे आंध्रप्रदेश हे भारतातले पहिले राज्य बनले. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे अनेक दिग्गज नेते पराभूत झाले पण नरसिंहराव विजयी झाले. १९८४ व १९८९ ची लोकसभा निवडणूक त्यांनी महाराष्ट्रातील रामटेक मतदारसंघातून लढवली व जिंकली. १९९१ साली राजीव गांधी यांच्या हत्येनंतर ते काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष बनले. लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यावर त्यांची पंतप्रधान म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. पंतप्रधान बनल्यावर देशाची विस्कटलेली आर्थिक घडी सांभाळण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते. त्यांनी मनमोहन सिंग यांची अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली. मनमोहन सिंग हे निष्णात अर्थतज्ज्ञ होते. नरसिंहराव, मनमोहन सिंग जोडीने आधीच्या सरकारचे सर्व निर्णय बाजूला ठेवून आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला. ज्यावेळी अतिशय गंभीर आर्थिक संकटातून देश सावरला त्यावेळी नरसिंहराव यांना फादर ऑफ इंडियन इकॉनॉमिक रिफॉर्म्स असे म्हटले जाऊ लागले. यासाठी १९९४ साली मनमोहन सिंग यांना युरो मनीने सर्वोत्तम अर्थमंत्र्यांच्या पुरस्काराने गौरविण्यात आले तेंव्हा त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की याचे खरे श्रेय नरसिंहराव यांना दिले गेले पाहिजे. नरसिंहराव सरकारने १९९२ सालच्या अर्थसंकल्पात परकीय गुंतवणुकीला पोषक धोरण आणले त्यामुळे शेअर बाजारात तेजीचे वातावरण निर्माण झाले. मोठ्या प्रमाणावर तोट्यात असलेल्या सरकारी संस्थांचे पुनर्जीवन करण्यासाठी खाजगीकरणाची सुरवात नरसिंहराव यांनी केली तर सेबी अर्थात सिक्युरिटी एक्सचेंज बोर्ड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंजची सुरवात देखील त्यांनीच केली. देशाच्या विकासाला गती देण्यासाठी त्यांनी खासदार निधीची सुरवात केली. सत्तेवर आल्यावर त्यांनी पंजाबमध्ये निवडणुका घेतल्या या निवडणुकीनंतर बियांत सिंग हे पंजाबचे मुख्यमंत्री बनले. त्या सरकारने दहशतवादाविरुद्ध कठोर पावले उचलून राज्यात शांतता प्रस्थापित केली. पंजाबमधील दहशतवादाचे उच्चाटन करण्यामध्ये आणि फुटीरतावादी चळवळीला क्षीण करण्यामध्ये नरसिंहराव यांनी त्यांच्या खंबीर निर्धाराचे दर्शन घडवले. नरसिंहराव म्हणायचे जग बदलले आहे, देशात देखील बदल झाले पाहिजेत. आपल्या याच सिद्धांताला सोबत घेऊन भारताच्या परराष्ट्र धोरणाला नवा आकार देत त्यांनी आग्नेय आशिआई देशांसोबत मैत्रीचा प्रारंभ लूक ईस्ट या धोरणाने केला. सत्तेवर असताना त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाल्याने १९९८ सालच्या निवडणुकीत काँग्रेसने त्यांना उमेदवारी नाकारली त्यामुळे त्यांनी राजकारणातून संन्यास घेतला. त्यांच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप न्यायालयात सिद्ध होऊ शकले नाहीत. २३ डिसेंबर २००४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या पुण्यतिथी दिनी त्यांना विनम्र अभिवादन!



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## निर्णय घ्यायल वेळ लागेल - भुजबळ

**मुंबई -** राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते छगन भुजबळ यांनाही डावलण्यात आलं. मंत्रिपदाची संधी न मिळाल्यामुळे छगन भुजबळ हे नाराज आहेत. आज (२२ डिसेंबर) छगन भुजबळ यांची राज्यभरातील ओबीसी नेत्यांबरोबर बैठक पार पडली. या बैठकीनंतर छगन भुजबळ यांनी माध्यमांशी संवाद साधत पुन्हा एकदा अजित पवार यांच्यावर नाराजी व्यक्त केली. तसेच पुढची भूमिका घेण्यासाठी आपण सर्वांशी चर्चा करत असून निर्णय घेण्यासाठी वेळ लागेल, असंही भुजबळ यांनी म्हटलं आहे. पत्रकार परिषदेत छगन भुजबळ यांना तुमची पुढची भूमिका काय असेल? असा प्रश्न विचारला असता ते म्हणाले की, माझ्या पुढच्या भूमिकेबाबत तुम्हाला घाई झालेली दिसते. मात्र, मला माझी भूमिका घ्यायला वेळ लागेल. त्यासाठी मी सर्वांशी चर्चा करत आहे, असं सूचक विधान छगन भुजबळ यांनी केलं. 'काही वरिष्ठांना मंत्रिपद दिलं नाही, याचं कारण तरुणांना मंत्रिमंडळात संधी द्यायची असते', असं अजित पवारांनी एका मेळाव्यात बोलताना म्हटलं. यासंदर्भात छगन भुजबळ यांना प्रतिक्रिया विचारली असता ते म्हणाले, तरुणांना मंत्रिमंडळात संधी द्यायची ही चांगली गोष्ट आहे. मात्र, तरुणांना संधी द्यायची यासाठी व्याख्या ठरवली पाहिजे. मग त्यामध्ये किती वर्षांपर्यंत तरुण म्हणायचं? मग ६७ ते ६८ वर्षांपर्यंतही तरुण म्हणायचं का? हे ठरवलं पाहिजे ना?, असा टोला छगन भुजबळ यांनी लगावला.

## शिवसेना, मनसे - मुजोर परप्रांतीयांना धडा शिकवा

भाजप आशीर्वादित महायुतीला कोणत्याही अनैतिक मार्गाने का असेना पाशवी बहुमत मिळाले.पाशवी ह्या शब्दाला जागत युतीचे नेतेही सत्तेसाठी साठमारी करत राज्याला वाऱ्यावर सोडून २१ डिसेम्बर पर्यंत बिनखात्याचे मंत्री म्हणून सरकारी सुखसुविधा मात्र दोन हातानी निर्लज्जपणे ओरबाडत आहेत.असे कोडगे पाषाणहृदयी नेते महाराष्ट्रात जन्माला आले हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे.



पाशवी बहुमताचा माज मात्र भाजप नेते कार्यकर्ते हे विरोधी पक्षाचे कार्यालय फोड,कार्यकर्त्यांना मारहाण कर असे प्रकार करू लागले,मराठी माणसांविरुद्ध लोण कल्याण डोंबिवली ठाणे,मुंबई पुणे नाशिक येथे उमटू लागले.शुक्लाने तर पदाचा माज दाखवत गुंडाना पाचारण करून टाकेपडेपर्यंत जखमी केले,मराठी भाषेवरून अपशब्द उच्चारले.मराठी महिला रिक्षा ड्रायव्हरला परप्रातिंयाने नाकातून रक्त येईपर्यंत सणसणीत थोबाडीत लावून दिली. आता आमचे राज्य आहे तर मारवाडीत बोला मराठी चालणार नाही हा क्रूर माज त्या परप्रातिंयाने कुठून निर्माण केला.मनसे नेते अविनाश जाधव यांनी त्याला तेथेच जागेवर खळ्ळ खट्याक चोप देऊन त्याचा बोजा बिस्तारासहित महाराष्ट्रातून हाकलून दिले पाहिजे होते ते न करता दोन चापट्या मारल्या आणि माफी मागायला लावून सोडून दिले हे मनसेचे हे वागणे मात्र खटकले.कुर्ला येथे संजय निरूपमच्या कार्यकर्त्यांनी मनसेच्या पदाधिकाऱ्यांचे डोके फोडून रक्तबंबाळ केले तरी त्याला जशास तसे उत्तर देण्यास मनसे कमी पडली त्यामुळे मनसेबद्दल असलेली आदरयुक्त भीती नाहीशी झाली.अविनाश जाधव हे निवडणुकी हरले तरी कर्तव्य म्हणून महिलेला मदत करण्यासाठी धावून आले.हि अभिनंदनीय बाब आहे.शुक्लच्या मदतीला आलेले दोन मराठी गुंड आपण आपल्याच मराठी माणसावर हात उचलतो ह्याची जाण न ठेवणाऱ्या गुंडाला जन्माची अद्दल घडेल अशी शिक्षा शिवसेना स्टाईलने दिली पाहिजे होती.महायुतीच्या गेल्या तीन वर्षाचा व सध्या अस्तित्वात आलेल्या सरकारचा इतिहास पाहता मराठीद्वेष्ट्या परप्रांतीयांचा माज वाढत चालला आहे.म्हणून मराठी माणसा विरुद्ध घटना वाढत आहेत त्याला लांडगेसारखे पोलीस उपनिरीक्षक मराठी लाभले आहेत अश्याना कर्तव्यात कसूर केली म्हणून तात्काळ निलंबित केले पाहिजे.मराठी माणसावर अन्याय झाला कि पेटून उठणारे पूर्वीचे शिवसैनिक व मनसे सैनिक हे तात्काळ अरे ला कारे चे उत्तर देत होते तर आताचे मनसे व शिवसेना सैनिक हे चापट्या आणि माफीवर सुटका करतात हि डॅशिंगपणाची अधोगती नाही काय ?महाराष्ट्र मराठी माणसासाठी जीवाचे रान करणारी शिवसेना आणि मनसे ह्या दोनच संघटना आहेत.तरी मराठी माणूस वेगवेगळ्या पक्षात विखुरला असला तरी प्रसंगी धावून येणारा सेने मनसेच्या पाठीशी एकजूटीने उभा राहत नाही हि मराठी माणसाची वैचारिक अधोगती नाही काय ? मराठी माणूस हा शिवसेना मनसेचा श्वास आहे त्याला मराठी माणसाने व्हेंटिलेटरवर ठेवू नये हि माफक अपेक्षा आहे.राजकारणाची बदलती समीकरणे दिसत असूनसुद्धा शिवसेना मनसे आपल्या अहंकारामुळे एकत्र येणार नाहीत तरी एकमेकांवर कुरघोड्या करू नका व मराठीपणाचा घेतलेला वसा टाकू नये तर आता प्रसंगी आक्रमक होण्याची गरज आहे. कारण विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे केंद्र सरकारचे सांगकामे आहेत, आपल्या माणसांना क्लीन चिट देणे, भ्रष्टाचार्यांना पाठीशी घालणे, विरोधकांना सूडबुद्धीने त्रास देणे,महाराष्ट्राचे तुकडे करणे ह्या विचारांचे आहेत.



**यशवंत चव्हाण,**
**सीबीडी बेलापूर ९९२०७७६२७७.**

## वर्धापनदिनानिमित्त कुणबी समाजोन्नती संघतर्फे मिरवणूक सामाजिक मेळाव्याचे आयोजन

**मुंबई । प्रतिनिधी -** कुणबी समाजोन्नती संघ मुंबई (रजि.) शाखा विक्रोळी- घाटकोपरतर्फे शाखेच्या २५ व्या वर्धापनदिनानिमित्त भव्य मिरवणूक,सामाजिक मेळावा,दिनदर्शिका-२०२५ चे प्रकाशन सोहळ्याचे आयोजन विक्रोळी पार्क साईट शिवाजी मैदान,विक्रोळी (प.)मुंबई -७९ येथे रविवार दि.२९ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी ३-३० ते ९ या वेळेत करण्यात आले आहे. सुरुवातीला दुपारी ३-३० वा.राम नगर शिवसेना शाखा क्रमांक १२७ येथून मिरवणूक सुरु होणार असून ती अमृत नगर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुण पुढे बँक ऑफ इंडीया मार्गे सुजाता हॉटेल आशिर्वाद सोसायटी जवळून संदेश विद्यालय ते विद्यादीप शाळेकडून खाली साईबाबा मंदीर असे करून श्री छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे समारोप साठी सायंकाळी ५ ते ५-३० वाजेपर्यंत पोहचेल.या कार्यक्रमाला कुणबी समाजोन्नती संघ मुंबई या मातृ संस्थेचे पदाधिकारी,युवक मंडळ पदाधिकारी, बळीराज सेना पदाधिकारी,कु.स.संघ शाखा विक्रोळी-घाटकोपर पदाधिकारी,सदस्य, सभासद,महिला मंडळ पदाधिकारी,सदस्य आणि सभासद,आजी -माजी पदाधिकारी,सदस्य, वधू - वर सूचक मंडळ पदाधिकारी,हितचिंतक मोठया संख्येने उपस्थित रहाणार आहेत.तरी सर्व कुणबी समाज बांधव,भगिणी,युवावर्ग सर्वांनी आपला बहुमुल्य वेळ समाज्यासाठी द्यावा आणि सहकार्य करून सहभागी व्हावे असे कु.स. संघ मुंबई विभागीय शाखा विक्रोळी - घाटकोपर पदाधिकारी,सदस्य आणि सभासद यांच्यातर्फे आवाहन करण्यात आले आहे.

## एकनाथ शिंदे दरे गावी

**सातारा :** उपमख्यमंत्रीपद मिळाल्यानंतर प्रथमच एकनाथ शिंदे हे त्यांच्या दरे या मूळ गावी आले आहेत. त्याच्या सोबत खासदार श्रीकांत शिदे हेदेखील दरे गावी पोहोचले आहेत. गावातील हेलिपॅडवर आगमन झाल्यानंतर ग्रामस्थांबरोबर प्रशासकीय अधिकाऱ्यांनी एकनाथ शिंदे यांचे स्वागत केले. शिंदेंचा हा दौरा तीन दिवसाचा असून या दरम्यान ते पूर्णपणे विश्रांती घेणार असल्याचं त्यांच्या निकवर्तीयांकडून सांगितलं जात आहे.

पान १ वरुन

### सखोल चौकशी ...

आम्ही आपणास विनंती करीत आहोत या मृत्यूचा देखील सखोल तपास करण्यात यावा व स्व. सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्यूस जबाबदार अधिकारी कर्मचारी यांना कठोर शिक्षा करून त्यांचा कुटुंबीयांना न्याय लवकरात लवकर द्यावा ही आपणास विनंती करीत आहोत, अन्यथा सकल मराठा समाज यांच्या वतीने या दोन्ही घटनेच्या निषेधार्थ व सरकारच्या विरोधात सकल मराठा समाजाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल. यावेळी तालुक्यातील सकल मराठा समाज बांधव मोठ्या संखेने उपस्थित होते.

### काव्य कस्तुरीमध्ये ...

स्वाती रत्नपारखी यांनी अत्यंत मार्मिक शब्दांमध्ये टिपला असल्याचे सांगून वेगवेगळ्या कवितांमध्ये त्यांनी जीवनाचे आलेले चांगले वाईट अनुभव बारकाईने लिहिले आहेत. कविता ही ठरवून लिहिता येत नाही. त्यासाठी कुठली ना कुठली घटना आणि चिंतन आवश्यक असते. तुमची एखाद्या घटनेकडे पाहण्याची दृष्टी सापेक्ष आणि निरपेक्ष असल्यास त्यातूनच कविता कागदावर उतरते असे त्यांनी नमूद केले. तर अर्चना डावरे यांनीही स्वाती रत्नपारखी या नात्याने माझी जाऊ असली तिच्यात एवढी मोठी कवयित्री दडलेली आहे हे मी हा कथा संग्रह वाचून अनुभवत आहे. जीवनात त्यांनी अनेक चढ उतार पाहिले. परंतु त्या कधीही खचल्या नाहीत. परिवारातील संस्कार आणि नेहमी काहीतरी चांगले करत राहण्याची असलेली त्यांची धडपड काव्य कस्तुरीमधून दिसून येते. नातेसंबंध आणि निसर्गही या कविता संग्रहातून आपल्याला अनुभवयाला मिळत आहे. हा त्यांचा कविता संग्रह पहिला असला तरी भविष्यातही त्या आणखी साहित्य निर्मिती करतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रास्तविकात लेखिका स्वाती रत्नपारखी यांनी आज मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या प्रकाशन सोहळ्याने आणि माझ्या कविता संग्रहातील कवितांवर प्रा.डॉ. शशीकांत पाटील तसेच अर्चना डावरे यांनी त्यातील जे काही बारकावे आणि गहन अर्थ अत्यंत सोप्या भाषेत सांगितल्यावर आपण किती चांगले लिहिले आहे हे उमगले त्यामुळे आपण सर्व मान्यवरांचे कायम ऋणी राहू वडिलांच्या आग्रहास्तव मी या कथा संग्रहाचे प्रकाशन केल्याचेही त्यांनी नमूद केले. अभय शास्त्री यांनी आमच्या प्रकाशनाचे हे एकविसावे पुस्तक असल्याचे सांगून स्वाती रत्नपारखी यांनी आणखी लिहिण्यासाठी मोठी संधी उपलब्ध असल्याचे ते म्हणाले. सूत्रसंचालन संपदा काटे-कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमास शहरातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

### फनरनर्स - रोट्रॅक्ट ...

तृतीय शिल्पी,

०३ कि. मी. १८ वयोगट पुरुषः प्रथम कपिल रामगवे, द्वितीय राम चौधरी, तृतीय चेतन साबळे, महिलाः प्रथम भक्ती दागडिया,द्वितीय प्रियांशी भातलवंडे, तृतीय जोना निर्मळ हे विजेते ठरले. मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन विजेत्यांचा गौरव करण्यात आला. या वेळी प्रायोजक, फनरनर्स- रोट्रॅक्ट क्लब ऑफ जालना चे सदस्य, स्पर्धकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**झुंबा, नृत्य, उत्साह...!**

स्पर्धा प्रारंभ होण्यापूर्वी राष्ट्रगीत नंतर सामुहिक झुंबा नृत्य, योगासने करण्यात आली. स्पर्धकांचा उत्साह वाढविण्यासाठी ठिक- ठिकाणी ढोल पथक, वाद्यवृंद, फळे, ज्यूस, पाणी, आरोग्य पथक तैनात होते. पोलीस प्रशासनाने स्पर्धेच्या वेळी दोन्ही कडील वाहतूक बंद ठेवली. स्पर्धेत मराठवाड्यासह पुणे, मुंबई, हैद्राबाद येथील धावपटू ,महिलांनी सुध्दा लक्षणीय सहभाग नोंदवला,

**उत्कृष्ट संयोजना साठी** जालना फनरनर्स व रोटरॅक्ट क्लब च्या सर्व सदस्यांचे उपस्थित मान्यवर , धावपटु व जालनेकरांकडुन कौतुक केले.

### तरुणांमध्ये मोबाईलचे ...

कीर्तनाच्या भव्य कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मंचावर माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, निर्मला दानवे, भास्कर दानवे, शालिकराम म्हस्के, राजेश म्हस्के, शोभा मतकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

पैशावर प्रेम करण्यापेक्षा माणसांवर प्रेम करा. देव आहे. पण तो कोठे आहे हे ओळखता आले पाहिजे. गोरगरिबांची सेवा, आई-वडिलांच्या सेवेसोबत माणसाने निःस्वार्थ कर्म केले तर नक्कीच ईश्वर प्राप्ती होईल. उपवास केल्याने आजपर्यंत देव कोणाला भेटला नाही पण जर प्रत्येकाने निःस्वार्थ कर्म केल्यास निश्चित देव भेटल्याशिवाय राहणार नाही.

तरुणांनो, व्यसन मग ते कोणते असो, तुमचे जीवन उद्ध्वस्त करू शकते. तेव्हा व्यसनापासून दूर राहा, असा उपदेश यावेळी महाराजांनी केला.

महाराजांनी ग्रामीण भाषेतील विविध विनोदातून हे प्रबोधन केल्याने श्रोत्यांत एकच हशा पिकला होता. राजेश म्हस्के यांनी प्रास्ताविक केले. यावेळी माहोरा परिसरातील महिला-पुरुषांनी हजारोंच्या संख्येने गर्दी केली होती.

आजच्या काळात शिक्षणाशिवाय पर्याय नाही. शिकेल तो टिकेल. म्हणून विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात फक्त आपल्या शिक्षणाकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे. तसेच, तरुणांनी व्यसनांपासून दूर राहून आपल्या करिअरकडे लक्ष

दिले पाहिजे, असे आवाहन यावेळी माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी भाषणातून तरूणांना केले.

कीर्तनकार निवृत्ती महाराज इंदोरीकर यांचा असल्याचे माहिती होताच ग्रामीण भागातून अनेक महिला- पुरुष व तरूणांनी कडाक्याच्या थंडीतही दुचाकी, चारचाकी आणि काहीजणांनी गाडी भाड्याने करून कार्यक्रम ऐकण्यासाठी हजेरी लावली होती. त्यामुळे येथील मैदानात बसण्यासाठी जागा अपुरी पडली होती.

# बांगड कृषी फॉर्म येथील रंगनाथ महाराज मंदिरामध्ये महाप्रसाद संपन्न

## चाळीस वर्षांपूर्वीपासूनचा नित्य उपक्रम





**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील गणेश लाल बांगड, गोपाळशेठ बांगड, यांच्या शेतातील, रंगनाथ महाराज मंदिरामध्ये, दरवर्षीप्रमाणे महाप्रसाद ( भंडाऱ्याची ) आयोजन करण्यात आले होते. परमपूज्य रंगनाथ महाराज यांच्यावर निस्ती भक्ती असलेले, टेंभुर्णीच्या दत्त मंदिराची स्थापना करणारे परमपूज्य रंगनाथ महाराज यांच्या भक्तीमध्ये, अखंड ४० वर्षापासून नित्यनेमाने रंगनाथ महाराजांचा भंडारा, बांगड परिवार करत असतो, त्यांनी नुकतीच नावा येथील रंगनाथ महाराजांच्या मठात गोदान केलेले आहे,दान धर्मात नित्यनियमाने पुढे असणारे, सर्वसामान्यांना नागरिकांना नेहमी आपल्या हातून मदत करणारे, समस्या आणि अडीअडचणींना सामोरे जाणारे, मदत करणारे, हे बांगड परिवार टेंभुर्णी व परिसरामध्ये परिचित आहेत, टेंभुर्णी म्हणजे भंडाऱ्यांची टेंभुर्णी म्हणून नावलौकिक मिळवलेली, भक्तिमार्गात अग्रेसर असणारी, दान धर्मात आणि पूर्व देवतांच्या पूजा आर्चमध्ये, पुढे असणाऱ्या टेंभुर्णी नगरामध्ये बांगड परिवारांचा सुद्धा हातभार असतो. विविध धार्मिक कार्यामध्ये प्रसादांचे कार्यात बांगड परिवार नेहमीच पुढे असतो. पन्नास वर्षापासून टेंभुर्णी परिसरामध्ये त्यांची ही नित्य सेवा चालू आहे. त्यातच रंगनाथ महाराजांवर भक्ती असल्यामुळे त्यांच्या सेवेमध्ये कधीही खंड न पडू देणारे भांगड परिवार दरवर्षी डिसेंबर महिन्यामध्ये महाप्रसादांचा आयोजन करत असतात, याही वर्षी त्यांनी त्यांच्या शेतामधील मंदिरामध्ये हा महाप्रसादांचा आयोजन केलेलं होतं. तसेच याच मंदिरामध्ये दर चतुर्थीला सुद्धा भंडारा ते करत असतात. त्यांच्या या भंडार्यांचे त्यांचा नित्यनेम भक्ती मार्गातील ग्रुप हा याचे आयोजन करत असतो. या भंडार्यासाठी असंख्य भाविक भक्त आणि गावकरी तसेच त्यांचे नातेवाईक विविध गावावरून येणारे भक्त या भंडाऱ्याला हजेरी लावून गेले.

# जालन्यात नए दृष्टीकोन शिबीर, प्रवचन नही प्रयोग

## सन टू ह्यूमन फाऊंडेशनचा पुढाकार; सबका मंगल होय रे संकल्पना

**जालना । प्रतिनिधी -** देशातील प्रसिद्ध अशा सन टू ह्यूमन फाऊंडेशनच्या वतीने जालना शहरात प्रथमच २५ ते ३० डिसेंबर दरम्यान नए दृष्टीकोन वाला शिबीर आयोजित करण्यात आले आहे. हे शिबीर गणपती नेत्रालयाजवळील दानकुंवर महिला महाविद्यालयाच्या मैदानावर होणार आहे. या शिबिरात मानवी सुखकर आणि आरोग्यदायी कसे करता येईल या विषयी छोट्या छोट्या टिप्स- सूत्र याद्वारे केवळ प्रवचन नही प्रयोग ही संकल्पना राबविण्यात येणार असून सहभागी शिबिरार्थींना केवळ ऐकण्याचे काम करायचे नाही तर शारीरिक हालचाली करायच्या आहेत. या शिबिरासाठीच्या नोंदणीला मोठा प्रतिसाद मिळाला असून रविवारी शिबिरासाठी नेमके कुठले कुठले मुद्दे महत्त्वाचे आहेत याविषयी माहिती देण्यात आली.

हे शिबीर दररोज सकाळी सात ते नऊ या वेळेत होणार असून सहभागी शिबिरार्थींनी पंधरा मिनिटि आधीच शिबीरस्थळी पोहचायचे आहे. येताना सोबत योग करण्यासाठीची चटई तसेच नाष्टा करण्यासाठी ताट, पाण्याची बाटली सोबत आणायची आहे. याच शिबिरात सेवा देण्यासही महत्त्व राहणार आहे. शिबिरामध्ये ध्यान साधना देखील करून घेतली जाणार असून ईश्वराच्या भक्तीरंगामध्ये नृत्य करून ईश्वराशी एकरूप कसे व्हावे या संदर्भातही तज्ज्ञ मार्गदर्शन मिळणार आहे. सहभागी होण्यासाठी विराट सेल्स पोलिस कॉम्प्लेक्स, श्री फ्लेपिक मोबाइल शॉपी दुर्गामाता रोड येथे संपर्क साधून नाव नोंदणी करणे बंधनकारक आहे. अत्यंत मर्यादित प्रवेश क्षमता उपलब्ध असून सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी प्रत्यक्ष येऊन नाव नोंदणी करणे गरजेचे असल्याचे संयोजकांनी सांगितले आहे.

**परमपूज्य आलयजी यांचेही मार्गदर्शन लाभणार**

या शिबिरामध्ये २८ ते ३० डिसेंबर दरम्यान या फाऊंडेशनचे प्रमुख पूज्य परम आलयजी यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून ते सलग तीन दिवस जालनेकरांना शास्त्रशुद्ध पद्धतीने संस्कृतीचे जतन करत मिळालेले जीवन कसे जगावे याबद्दल सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत. या शिबिराच्या माध्यमातून सहभागी शिबिरार्थींचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलण्याचे प्रयत्न येथे केले जाणार आहेत.

# राज्य महामार्ग जिंतूर जालना हायवेवर पथदिवे बसवण्यात यावेत

## नगरसेविका सौ यमुना दवणे यांची निवेदनाद्वारे प्रशासनास मागणी



**मंठा । प्रतिनिधी -** मंठा शहरा लगत जाणारा राज्य महामार्ग क्रमांक ७५२/१ जिंतूर जालना हायवेवर पथदिवे व गतिरोधक बसवण्यात यावेत अशा प्रकारच्या यांनी अशा प्रकारच्या मागणीचे निवेदन नगरसेविका सौ. यमुना शेषनारायण दवणे यांनी प्रशासनास आज दिले असून त्यांनी खालील निवेदनात नमूद केले आहे की, राज्य महामार्ग जिंतूर जालना या रोडचे रुंदीकरण होऊन जवळपास एक ते दीड वर्षे पूर्ण झाले आहे ,राज्य महामार्ग जिंतूर जालना या रोडचे रुंदीकरण होऊन जवळपास एक ते दीड वर्ष पूर्ण झाले आहे.

सदरील रोडवर केवळ शोभेचे खांब उभे केलेले आहेत परंतु त्यावरील पथदिवे चालू नाहीत या रोडवर एकही गतिरोधक नाही त्यामुळे एका वर्षामध्ये तब्बल १४१ निष्पाप नागरिकांचा बळी या रोडने घेतलेला आहे ,या रोडवरील पथदिवे चालू करून गतिरोधक बसवण्यात आले असते तर निश्चितच अपघाताचे प्रमाण कमी झाले असते.

रोडवरील पथदिवे चालू करून गतिरोधक बसवणे या मागणी करिता नगरपंचायत कार्यालय व सार्वजनिक बांधकाम कार्यालय या दोनही कार्यालयाकडूनयापूर्वी अनेक वेळा अनेक नागरिकांनी मागणी केलेली आहे परंतु या दोन्ही कार्यालयाने अद्यापही एकही काम पूर्ण केलेले नाही.

या १४१ निष्पाप नागरिकांच्या मरणास हे दोन कार्यालय जबाबदार आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की दोन दिवसापूर्वी विविध वर्तमानपत्रांमध्ये या महामार्गाबाबत नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम पत्रकार बांधवांनी केले होते त्या नंतर वेगवेगळ्या वृत्तपत्रांमध्ये रस्ते अपघात आटोक्यात आणण्याकरिता आपल्या वृत्तपत्राच्या माध्यमातून लक्ष वेधण्याचे काम पत्रकारांनी सुद्धा केले होते त्यानंतर सुद्धा बुधवार रोजी वृत्तपत्रात बातमी येते ना येतेच की, १३९निष्पाप नागरिकांचा या मृत्यू मृत्यू झाला होता त्या नंतर आज पर्यंत १४१ अपघातग्रस्तांची संख्या वाढली असून सदरील राज्य महामार्गावर गतिरोधक व पथदिवे बसवून प्रशासनाने ठोस पाऊल उचलावे व आपल्या स्तरावरून आदेशित करावेत अशी मागणी मंठा तहसील कार्यालयाचे नायब तहसीलदार काळदाते साहेब व जालना येथील जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपंचायतचे प्रभारी मुख्याधिकारी इंगोले साहेब यांना नगरसेविका सौ.यमुना शेषनारायण दवणे यांनी निवेदनाद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधत मागणी करण्यात आली.

# जे.ई.एस. महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जे.ई.एस. महाविद्यालयातील हिंदी विभागाच्या वतीने विद्यार्थी, शोधार्थी, शिक्षक, प्राध्यापकांठी दिनांक २३ डिसेंबर, २०२४ रोजी हिंदी के योजना-परियोजनापरक आयाम या विषयावर राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. हिंदी विषयाशी संबंधित विद्यार्थी, शोधार्थी, शिक्षक, प्राध्यापक, लेखक, प्रकाशक, शैक्षणिक संस्था, शोध संस्था, पुस्तकालय, प्रकाशन व्यवसाय, नियतकालिके प्रकाशन इत्यादिकरिता केंद्र सरकारच्या अनेक योजना आहेत. राष्ट्रीय चर्चासत्रे, कार्यशाळा, हिंदीतर भाषी हिंदी नवलेखक शिबिरे, व्याख्यानमाला इत्यादी आयोजनाकरिता आर्थिक तरतुदी केल्या जातात. केंद्रीय हिंदी निदेशालय, नवी दिल्लीच्या आर्थिक सहकार्याने अनेक योजना, शैक्षणिक प्रकल्प राबवले जातात. पुस्तक प्रकाशन, कोश निर्माण, अनुवाद, शोधयात्रांचा आजपर्यंत देशातील करोडों लाभार्थ्यांनी लाभ घेतला आहे. केंद्र सरकारच्या वतीने केंद्रीय हिंदी निदेशालय, नवी दिल्ली व केंद्रीय हिंदी संस्थान, आगराच्या माध्यमातून चालवल्या जाणाऱ्या आर्थिक योजनांची माहिती आपल्या भागातील विद्यार्थी, शोधार्थी, शिक्षक, प्राध्यापक तसेच शैक्षणिक कार्याशी संलग्न प्रत्येक व्यक्तिला मिळावी या उद्देशाने सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेमध्ये केंद्रीय हिंदी निदेशालय, नवी दिल्ली व केंद्रीय हिंदी संस्थान आगराचे मा. निदेशक मार्गदर्शन करणार आहेत. यासंबंधी अधिक माहितीकरिता कार्यशाळा संयोजक डॉ. नानासाहेब गोरे मो. क्र.९४२२२१९१८३ यांच्याशी संपर्क साधावा तसेच या कार्यशाळेत विद्यार्थी, शोधार्थी, शिक्षक, प्राध्यापक, लेखक, हिंदी प्रेमी तसेच हिंदीसेवी यांनी जास्तीत जास्त संखेने उपस्थित रहावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री व कार्यशाळा संयोजक डॉ. नानासाहेब गोरे यांनी केले आहे.

# महापुरुषांच्या स्मारकांच्या कामाला गती द्या; आमदार लांडे यांची मागणी

**मुंबई -** महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यांच्या सीमावादातून कर्नाटकात मराठी माणसांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात केंद्र सरकारने मराठी माणसाला न्याय द्यावा, अशी मागणी करतानाच चांदिवलीचे आमदार दिलीप लांडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकांच्या कामाला गती द्यावी तसेच साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे आणि संत ककय्या महाराज यांची स्मारके उभारण्यात यावीत, अशी विनंती राज्य सरकारला केली. विधानसभेत राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलताना दिलीप लांडे यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन केले. पंतप्रधान आवास योजनेतून ४,४७५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून सिडकोच्या माध्यमातून ६७ हजार घरे बांधून देण्यात येणार आहेत. पण त्याचवेळी एमएमआरडीएने २००८ -०९ मध्ये प्रकल्पग्रस्तांसाठी बांधलेल्या इमारती राहण्यास योग्य नसल्याकडे लक्ष वेधून क्रांती नगर, संदेश नगर आणि जरीमरी या मिठी नदीच्या पात्रातील धोकादायक ठिकाणच्या प्रकल्पबाधितांना हक्काची घरे देण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी दिलीप लांडे यांनी केली. जलजीवन मिशन योजनेअंतर्गत एक कोटी २७ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याने ग्रामीण भागात घरगुती जोडणी देण्यात येत आहेत. पण चांदिवली मतदारसंघात अंबिका नगर, वाल्मिकी नगर, अशोक नगर, राजीव नगर या डोंगराळ भागात पाणी मिळत नसल्याने भूमिगत टाक्या देण्यात येऊन अशा ठिकाणी पाणीपुरवठा करण्यात यावा अशी मागणी ही लांडे यांनी केली. नैसर्गिक आपत्तींचा धोका लक्षात घेऊन डोंगराळ भागातील धोकादायक वस्त्यांची पाहणी करून या लोकांना सुरक्षितरित्या स्थलांतरित करण्यात यावे, अशी मागणी दिलीप लांडे यांनी केली.

# जालन्यात श्वानांसह पाळीव प्राण्यांचे मोफत लसीकरण व आरोग्य तपासणी




**जालना । प्रतिनिधी -** जूना जालना, गांधी चमन परिसरातील समर्थ पेट शॉपतर्फे २२ डिसेंबर रोजी श्वान व इतर ४०० प्राण्यांचे लसीकरण व आरोग्य तपासणी श्वान प्रेमी नितीन इंगळे व डॉ.मुकूंद जमधडे यांच्या मार्गदर्शनाखाली केली.

१० व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून सदरील लसीकरण व आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. यावेळी विविध जातीचे मांजर व श्वान,पाळीव जनावरांची मोफत आरोग्य तपासणी करून लसीकरण करण्यात आले.यावेळी समर्थ पेट शॉपचे संचालक नितीन इंगळे, डॉ. मुकुंद जमधडे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी मॉ सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब वानखडे, सुभाष पवार, धरम इंगळे लक्ष्मण वानखडे, सचिन वाघमारे, किरण गरड, सुनील पवार ,रामेश्वर जावळे ,अनिकेत वाघमारे, वैभव वानखेडे, सचिन वानखेडे, अनिकेत वाघमारे, रामेश्वर इंगळे, सचिन जैवळ यांच्यासह शहरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच नवीन शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट - प्राचार्य डॉ देशमुख

**जाफराबाद । प्रतिनिधी -** येथील सिद्धार्थ कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मध्ये आजीवन शिक्षण व विस्तार विभाग अंतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० विषयी स्वयंसेवकांना मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमात प्रा डॉ कैलास पाटील यांनी मार्गदर्शन केले याप्रसंगी बोलताना पाटील सर यांनी नवीन शैक्षणिक धोरणामध्ये झालेले बदल विद्यार्थ्यांना अत्यंत सोप्या पद्धतीने उलगडून सांगितले ज्यामुळे विद्यार्थ्यांना रोजगार मिळवण्यासाठी व भावी जीवनामध्ये समाजामध्ये वावरण्यासाठी एक सुसंस्कृत पिढी या धोरणातून कशी निर्माण होईल हे सांगण्याचा प्रयत्न केला.

अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ र तु देशमुख सर यांनी नवीन शैक्षणिक धोरण म्हणजे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व सर्वांगीण विकासातून विद्यार्थ्यांना रोजगार असे उद्दिष्ट असल्याचे सांगितले. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये भारतीय ज्ञान परंपरेला अनन्यसाधारण महत्व देण्यात आल्याचे त्यांनी म्हटले आहे. याप्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रो. डॉ सुनिल मढे, आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे प्रा डॉ शरद मोहरीर, प्रा मनिष बनकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा मनिष बनकर यांनी केले.




यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक प्रा अनिल वैद्य, प्रा संजय साळवे, प्रा बी.बी. चव्हाण, प्रा डॉ सुदाम पाटील, प्रा डॉ निलेश भोसले, प्रा उत्तम वाघ विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

# एनएमएमएस परीक्षा सुरळीत



**बदनापूर । प्रतिनिधी -** एनएमएमएस परीक्षा महाराष्ट्रभर रविवारी सर्वत्र सुरळीत पार पडली असून बदनापूर तालुक्यात मथुरादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व कन्या विद्यालय अशा दोन केंद्रावर ही परिक्षा सुरळीत पार पडली.

या परीक्षा केंद्रावर गटशिक्षणाधिकारी दत्तात्रय क्षीरसागर यांनी भेट देऊन परीक्षेची पाहणी करून सूचना दिल्या. मथुरादेवी विद्यालय येथे ३५१ परीक्षार्थीपैकी ३५० तर कन्या विद्यालयातील ३५१ परीक्षार्थीपैकी ३४८ परीक्षार्थींची उपस्थिती होती. परीक्षा सुरळीतपणे पार पडली असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.

# जुन्या भांडणाच्या कारणावरून तरुणास चाकूने भोसकले

## म्हाडा कालनी येथील घटना

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील महाडा कॉलनी दरेगाव रोड येथे फिर्यादी कृष्णा बाबुराव मोरे वय २७ वर्ष धंदा मजुरी यांना संशयित आरोपी बलवान सिंग टाक याने माढा कॉलनी येथे दिनांक १९ गुरुवार रोजी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास हनुमान मंदिरासमोर फिर्यादी हा उभा असताना घरासमोर येऊन जुन्या भांडणाच्या कारणावरून शिवीगाळ करत पोटात चाकू मारून गंभीर जखमी केले आहे यावरून जखमी तरुणावर एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असून या प्रकरणी संशयित आरोपी बलवान सिंग टाक याच्या विरोधात तालुका पोलीस ठाण्यामध्ये दिनांक २१ शनिवार रोजी रात्री दहा वाजता कलम ३५२ ३५१ नुसार तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेचा पुढील तपास बीट जमदार गायकवाड हे करीत आहे.



## जयवर्धन राठोड भारतीय नॅशनल चॅम्पियनशिप स्केटिंग स्पर्धेत प्रथम



**मंठा । प्रतिनिधी -** नुकत्याच छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या भारतीय नॅशनल चॅम्पियनशिप स्केटिंग स्पर्धेमध्ये मंठा येथील जयवर्धन नितीन राठोड यांच्या मुलाने पहिला क्रमांक पटकाविला आहे. मंठा शहराचे माजी नगराध्यक्ष नितीन राठोड त्यांचा जयवर्धन हा मुलगा आहे त्याच्या या यशाबद्दल आजोबा माजी जिल्हा परिषद सदस्य उत्तमराव राठोड आजी नगरसेविका नंदाताई राठोड आई-वडील शिवसेना जिल्हाप्रमुख तथा बाजार समिती सभापती ए जे बोराडे, माजी उपनगराध्यक्ष बाळासाहेब बोराडे गगटनेते अचित बोराडे, वैजनाथ बोराडे, विकास सूर्यवंशी अरुण वाघमारे, सचिन बोराडे, जे.के कुरेशी सर्वस्तरातून कौतुक शुभेच्छा वर्षाव होत आहे.

## मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत टिंवकल स्टारचे यश

**बदनापूर । प्रतिनिधी -** निर्मल क्रीडा व समाज प्रबोधन ट्रस्ट संचलित टिंवकल स्टार स्कूल या शाळेने मुख्यंमत्री माजी शाळा सुंदर शाळा टप्पा दोन मध्ये तालुकास्तरावर द्वितीय क्रमांक मिळवला आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेतंर्गत मुख्यमंत्री माझी शाळा- सुंदर शाळा हे अभियान सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांकरिता राबवण्यात आले होते.



या अभियानांतर्गत शाळेचा परिसर, तेथील व्यवस्था, सुसुत्रता आदी त्रिसूत्रीनुसार तपासणी करण्यात येते, विद्यार्थ्यांना मिळणार्या विविध सोयी सुविधांची पाहणीही तज्ञांमार्फत होते. या अभियानांतर्गत बदनापूर येथील पाथ्रीकर कॅम्पस येथील टिंवकल स्टार स्कूलने संस्थेच अध्यक्ष डॉ. देवेश पाथ्रीकर यांच्या मार्गदर्शनाखाली खाजगी व्यवस्थापन या प्रकारात सहभाग नोंदवला होता. मुख्याध्यापिका निशीगंधा देशमुख व संस्थेचे प्रतिनिधी नारायण लव्हाळे यांनी अभियानांतगर्त आलेल्या समितीसमोर सादरीकरण केले. संस्थेचे अध्यक्ष डॉ.देवेश पाथ्रीकर यांनी या शाळेसाठी मैदान, क्रीडा साहित्य, ग्रंथालय, संगणक कक्ष, विज्ञान कक्षाबरोबरच विद्यार्थ्यांचा मानसिक व अभ्यासविषयक ताण कमी व्हावा म्हणून विविध उपाययोजना केलेल्या आहे.

या सर्व बाबींचा विचार करून समितीने या शाळेला तालुकास्तरावर द्वितीय क्रमांक देऊन गौरवीत केले. आता या शाळेचा जिल्हास्तरावर निवड झालेली आहे.

या अभियानातंर्गत पायाभूत सुविधा, शासन ध्येय -धोरण यांची अंमलबजावणी व शैक्षणिक गुणवत्ता या तीन प्रमुख निकषांचा विचार केला जातो. या शाळेच्या प्रगतीसाठी संस्थेच्या सचिव डॉ. एम. डी. पाथ्रीकर,डॉ. एस. एस. शेख्, डॉ. नाजमा खान आदी कायम पुढकार घेऊन शाळेला सर्व प्रकारच्या भौतिक व शैक्षणिक

सुविधा उपलब्ध करून देतात. शाळेच्या या यशाबद्दल तालुक्यातून शाळेवर व संस्थेवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेकडून कुंडलिका व सीना नदी जनजागृती रॅली




**जालना । प्रतिनिधी -** SFD विकासार्थ विद्यार्थीअंतर्गत कुंडलिका व सीना नदी संवर्धन जनजागृती रॅली काढण्यात आली. व म हानगरपालिकेच्या आयुक्तांना व जिल्हा अधिकार्‍यांना आवाहन करण्यात आले पंधरा दिवसाच्या आत नदीचे अतिक्रमण हटवले गेले पाहिजे. अन्यथा अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या आक्रोशास सामोरे जावे लागेल असे निवेदन महानगरपालिकेच्या आयुक्तांना व जिल्हा अधिकार्‍यांना देण्यात आले.यावेळी अभाविप SFS संयोजक सचिन उगले, सोशल मीडिया संयोजक अजय डोंगरे, अजित मस्के, बाबासाहेब अबडकर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.